**विभाग  एक-  देवाविषयीचे प्रश्न**

*सतत देवाविषयी विचारले जाणारे प्रश्न*

सुरुवात करण्या आधी आपण स्वतःला काही प्रश्न विचारूया.

माझ्या साठी देव कोण आहे?

देवासोबत माझं नातं काय आहे?

देव शिक्षा देतो का?

माझ्या मतानुसार देव प्रेमळ अथवा क्रोधीत देव आहे का?

माझी खात्री कशी पटेल कि जे मला देवाविषयी ठाऊक आहे ते खरं आहे?

**देव कोण आहे?**

देव सर्वसामर्थ्यवान आपला निर्माणकर्ता आहे. आपण त्याची लेकरे आहोत. त्याने आपल्याला त्याचा पुत्र येशु ख्रिस्त याच्या करवी आपल्याला पिता म्हणण्याचा अधिकार दिला आहे.

**येशू कोण आहे?**

येशू देवाचा पुत्र आहे. देव आकाश आणि पृथ्वी यांचा निर्माणकर्ता आहे. त्यानेच सर्वकाही उत्पन्न केले आणि तो त्याचा निर्माणकर्ता आहे. त्याने आपल्या एकुलत्या एका पुत्राला आपल्या पापासाठी वधस्तंभावरचे मरण दिले आहे. आणि त्याच्या नावामुळे आपल्याला त्याची मुले म्हणण्याचा अधिकार दिला आहे. त्याने वधस्तंभावर आपणासाठी प्राणाची आहुती दिली आणि आपल्याला वाचवले. येशु ख्रिस्तामुळेच आपल्याला पित्याला आबा म्हणण्याचा अधिकार मिळाला.

**पवित्र आत्मा कोण आहे?**

जेव्हा येशूने हि पृथ्वी सोडली तव्हा त्याने आपला पवित्र आत्मा आपल्या मध्ये वस्ती करण्यासाठी आणि आपल्याला मार्गदर्शन करण्यासाठी दिला. हाच पवित्र आत्मा आहे.

**येशु देव आहे का?**

हो. आमचा त्रैक देव आहे. पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा, देवाने स्वर्ग निर्माण केला, पृथ्वी आणि पृथ्वीवरील सर्व काही आणि मानव सुद्धा. त्याने त्याचा पुत्र येशु ख्रिस्त याला पृथ्वीवर पाठवलं. येशूने आम्हाला देवाच्या इच्छेप्रमाणे चालण्यासाठी शिकवलं आणि आमच्या पापांसाठी वधस्तंभावरचे मरण पत्करले. क्रूसावरील मरण सहन करून त्यानी आमची पापं पवित्र रक्ताने धुवून आमचा देवाबरोबर समेट घडवला. त्याने पवित्र आत्म्याला आम्हामध्ये वस्ती करण्यासाठी पाठवले.

आम्ही जर पवित्र आत्म्याला पाचारण केले तर तो आम्हामध्ये वस्ती करण्यासाठी तयार आहे.

**माझ्याकरता देव कोण आहे?**

देव आमचा स्वर्गीय पिता आहे. आपण परमेश्वराकडे आपला पिता म्हणून बघतो व आपण त्याची निर्मिती आहोत. पण या सत्यापेक्षा अजून काही आहे. देव आपला पिता व आपण ख्रिस्त येशुमुळे त्यांची लेकरे आहोत. जेव्हा आम्ही त्याच्या एकुलत्या एक पुत्र येशु ख्रिस्तावर विश्वास ठेवतो तेव्हा आम्ही देवाची लेकरे म्हणून गणले जातो. ख्रिस्त येशुद्वारे आम्ही निर्माण कर्त्या देवाला आबा, बाप्पा अशी हाक मारू शकतो.

**देवाला आम्हाकडून काय हवे आहे?**

देव आम्हावर प्रीती करतो हे जाणून घ्यावे अशी त्याची इच्छा व आम्ही त्याच्यावर पिता म्हणून प्रेम करावे हि त्याची इच्छा आहे. आम्हा प्रत्येकासाठी त्याच्या महान योजना आहेत. आम्ही त्याच्यावर प्रीती करावी आणि आमचे त्याच्याशी नाते बळकट करावे, आम्ही त्याची प्रार्थना करावी, त्याच्या समवेत बोलावे, त्याच्या समवेत वेळ घालवावा, त्याचे मार्गदर्शन घ्यावे अशी त्याची इच्छा आहे.

**आपल्या आयुष्याचे ध्येय काय आहे?**

देवाची इच्छा पूर्ण करणे हे आपल्या आयुष्याचे ध्येय आहे आणि त्याची इच्छा आहे आहे कि आम्हाला त्याची आधी चांगली ओळख व्हावी व त्याच्या वर प्रीती करावी. तो आमच्यावर आमच्या कल्पनाशक्ती पलीकडे आणि शब्दात वर्णन करता येणार नाही इतकी प्रीती करतो. त्याच्यावर प्रीती कशी करावी हे जाणून घेण्यासाठी आणि त्याची आणि इतरांची यशस्वी सेवा व जीवन जगणे ह्यासाठी देवाच्या सान्निध्यात अधिक वेळ घालवणे.

**आपण देवाच्या अधिक जवळ कसे येऊ शकतो?**

देवाचे वाचन पवित्र शास्त्रामधून वाचून व त्यावर मनन करून आणि देवाच्या पवित्र सानिध्यात वेळ घालवण्याने आपण देवाच्या जवळ येऊ शकतो तसेच प्रार्थना करणे व देवाला आपल्या जीवनात दररोज प्रथम स्थान देणे हे आपले आद्य कर्तव्य असले पाहिजे.

**एकांत काय आहे? शांत वेळ काय आहे?**

देवाच्या चरणाजवळ त्याच्या सानिध्यात वेळ घालवणे हा एकांतपणा आहे. देव आपल्यावर प्रीती करतो व त्याची इच्छा आहे कि आपणा त्याच्यावर प्रीती करावी. गरज भासल्यावर आपण देवाच्या जवळ जातो व त्याची प्रार्थना करतो. देवाला आपल्याकडून अधिक काय हवे आहे? त्याची इच्छा आहे कि आपण फक्त आवश्यकतेनुसार त्याची प्रार्थना करू नये तर रोज त्याच्या सान्निध्यात राहावे. त्याला आपल्या आयुष्यात प्रथम स्थान द्यावे. परमेश्वराची इच्छा आहे कि आपण फक्त दुःखातच त्याची आठवण करू नये तर सुखात व आनंदात सुद्धा त्याची आठवण करावी.

त्याची इच्छा आहे कि आपण आपल्या समस्या आपली आव्हाने यश व आनंद त्याच्या बरोबर वाटून घेऊ. त्याची इच्छा आहे आपण आपले सर्वस्व त्याला वाहून द्यावे, म्हणजे तो आपल्याला मार्गदर्शन करून चांगुलपणा आणि ऐश्वर्य हे त्याने आपल्यासाठी साठवून ठेवले. ते तो आपल्याला देईल. ह्या सर्व गोष्टी मिळवण्याकरता आपल्याला त्याच्या बरोबर वेळ घालवला पाहिजे आणि त्याच्या आज्ञेचे पालन केले पाहिजे.

**आपल्यासाठी देवाच्या योजना काय आहेत? उद्धार म्हणजे काय?**

देवाची इच्छा अशी आहे कि प्रत्येकाला सार्वकालिक जीवन मिळाले पाहिजे. माणसांनी देवाविरुद्ध बंडखोरी केली आणि पापात अडकले. देव एवढा प्रेमळ आहे कि त्याने आम्हाला आशेविना सोडले नाही. त्याने आपला एकुलता एक पुत्र आपल्या पापांच्या क्षमेसाठी या जगामध्ये पाठवला. जेव्हा आपण येशूवर विश्वास ठेवतो आणि प्रायश्चित्त करतो. त्या वेळेस तो आपल्या पापांना क्षमा करतो व आपल्याला त्याच्या कळपात सामावून घेतो.

जेव्हा आपण येशूवर आपला तारणारा म्हणून विश्वास ठेवतो आणि आपला उद्धारकर्ता म्हणून स्वीकारतो आणि आपल्या पापांसाठी तो वधस्तंभावर खिळला गेला व पुन्हा उठला असा दृढ विश्वास धरतो. तेव्हा आपण देवाच्या अनंतकाळचा न्याय निवाडा आणि पापापासून मुक्त होतो. देवाच्या पवित्र सानिध्यात अनंत काळच्या जीवनाबद्दल निश्चित राहू शकतो. हाच उद्धार होय.

**काय देव खरोखर आपल्याला त्याच्या सानिध्यात बोलावतो?**

देवाची इच्छा आहे कि आपण त्याच्या पवित्र सान्निध्यात राहावे. देवाच्या प्रथम शिष्याने त्याला येउन विचारले, "तू कुठे राहतोस?" त्याने उत्तर दिले, माझ्या मागे या आणि पहा. मग तिथून पुढे सर्व शिष्य त्याच्या मागे चालू लागले. देवाची प्रीती सर्वांसाठी समान आहे. काल, आज आणि येथून पुढे सदासर्वदा समान आहे. आम्ही त्याला जाणून घेण्यासाठी उत्सुक आहोत. तर त्याने आम्हाला त्याच्या सोबत वेळ घालवण्यासाठी व त्याचा अनुभव घेऊन पाहण्यासाठी प्रेमाचे आमंत्रण दिले आहे.

आपण आपले हृदय व मन स्वेच्छेने त्याला समर्पण केले पाहिजे.

येशु म्हणतो कि, "*सर्व कष्टी आणि भाराक्रांत जन हो, तुम्ही सर्व मज कडे या म्हणजे मी तुम्हाला विश्रांती देईन.*

खरोखर देव खूप प्रेमळ आहे आणि तो आम्हाला त्याच्या सान्निध्यात येण्यासाठी आमंत्रित करत आहे.

**येशूची आराधना का करावी?**

आम्ही येशूची आराधना करतो कारण तो देवाचा पुत्र आहे. तो ह्या पृथ्वीवर दैवी मार्गानुसार कसे वागावे हे शिकवण्यासाठी आला. तो आपल्याला पापामुळे येणाऱ्या राग आणि रोगराई पासून वाचवण्यासाठी आला. त्याने वधस्तंभावर प्राणाहुती दिली व सर्व समर्थ देवाबरोबर आपला समेट घडवून आणला.

**येशुकडे प्रार्थना करण्यासाठी विशिष्ट वेळ आहे का?**

येशुकडे प्रार्थना करण्यासाठी विशिष्ट वेळ किंवा विशिष्ट दिवसाची आवश्यकता नाही. देवाची इच्छा आहे कि आपण त्याच्या बरोबर रोज वेळ व्यतीत करावा. आपण दिवसाच्या कुठल्याही वेळी त्याची प्रार्थना करू शकतो. दिवसाच्या सुरुवातीला आणि रात्री झोपायच्या आधी आपण येशूची प्रार्थना करणे हे योग्य आहे. आपण दिवसाच्या सुरुवातीला त्याची प्रार्थना करून आशीर्वाद घ्यावेत. रात्रीच्या वेळी झोपायच्या आधी आपण त्याने दिवसभर दिलेल्या आशीर्वादाबद्दल उपकार मानू शकतो आणि झालेल्या चुकाबद्दल क्षमा मागून त्याचे मार्गदर्शन घेऊ शकतो.

आपण आपल्या प्रिय व्यक्तीसाठी, शेजारयासाठी व मित्रासाठी प्रार्थना करू शकतो. आपण दुसऱ्यासाठी प्रार्थना केलेली देवाला आवडते म्हणून आपण दुसऱ्यांसाठी प्रार्थना करण्यासाठी वेळ घालवला पाहिजे.

**मासिकपाळी असताना आपण चर्चमध्ये जाऊ शकतो?**

हो. आपण मासिक पाळी सुरु असताना चर्च मध्ये जाऊ शकतो. असा कुठलाहि कायदा नाही किंवा असे कुठलेही बंधन नाही. येशु आजारी- सुदृढ, श्रीमंत- गरीब, लहान मुले- मोठी माणसं सगळ्यासाठी आजही उपलब्ध आहे. येशु आपल्यामध्ये वस्ती करण्यासाठी आला. देवाचा पुत्र असल्यामुळे त्याला कुठे जन्म घ्यावा हे निवडण्याचा अधिकार होता. तरी त्याने गायीच्या गोठ्याची आपल्या जन्मासाठी निवड केली. श्रीमंत लोक त्याला भेटण्या आधी त्याने मेंढपाळांना भेटण्यासाठी आमंत्रित केले.

**आपण प्रार्थना कशी करावी?**

प्रार्थनेसाठी असे कुठलेही नियम किंवा बंधन नाही. आपण आपले हात जोडून किंवा उघडे ठेऊन प्रार्थना करू शकतो. आपण गुडघे टेकून, बसून किंवा प्रार्थना करू शकतो. येशु आपले अंतःकरण बघतो. म्हणून आपण अंतःकरण पूर्वक प्रार्थना केली पाहिजे.

स्तुती  आणि उपकार मानून आपण त्याची प्रार्थना केली पाहिजे. त्याने आपल्यासाठी आणि आपल्या प्रेमळ व्यक्तीसाठी जे काही केले त्याबद्दल आपण त्याचे उपकार मानले पाहिजे. आपण काही विशिष्ठ प्रार्थना रोज केल्या पाहिजेत. प्रार्थनेची वेळ हि अशी वेळ आहे कि आपण पित्याबरोबर सरळ बोलू शकतो. आपण आपल्या जगिक पित्याबरोबर काय बोलावे व कोणते शब्द

बोलावे ह्याची पूर्वतयारी करत नाही. प्रार्थना हि स्वयंप्रेरित असावी. अशा प्रकारे जेव्हा आपण देवाजवळ जातो तेव्हा आपली प्रार्थना स्वयंप्रेरित असावी. आपण शब्दांची अथवा वाक्यांची पूर्वतयारी करू नये.

देवांनी आपल्याला पवित्र शास्त्रातून जी वचने सांगितली आहेत. ती आपण त्याच्याकडे हक्काने मागितली पाहिजेत. आपण प्रार्थना करतो तेव्हा दुसऱ्यासाठी प्रार्थना केली तर देवाला समाधान वाटते, आनंद होतो.

**ज्या दिवशी प्रार्थना करावी असे काही विशिष्ट दिवस आहेत का?**

नाही. असे काही विशिष्ट दिवस नाहीत. प्रत्येक दिवस खास आहे. आपण रोज देवाची प्रार्थना केली पाहिजे. चर्च मध्ये रविवारची खास उपासना असते. ती आपण सर्व मंडळींसोबत करायची असते.

आपण प्रार्थनेसाठी आणि उपवासासाठी असा आठवड्यातला एक दिवस ठरवू शकतो. आपण प्रार्थनेचा एक गट तयार करून त्यात सुद्धा एकत्र येउन सर्वांसाठी आणि त्यांच्या गरजांसाठी प्रार्थना करू शकतो.

**आपण पाठ केलेले एखादे वचन आहे का जे आपण प्रार्थनेच्या वेळेस म्हणू शकतो? आणि केव्हा?**

तुम्ही असे वचन प्रार्थनेच्या वेळी म्हणू शकता किंवा नाही. आपला प्रेमळ प्रभू येशु ख्रिस्त हा आपले हृदय व मन जाणतो. पण हि एक चांगली सवय आहे. बायबल मधील वचने प्रार्थनेच्या वेळी आठवण्याची आणि हक्काने मागण्याची. पवित्र शास्त्र सत्य आहे. पवित्र शास्त्रातील अभिवचने आपल्यासाठीच आहेत. आपण त्यांच्यावर विश्वास ठेऊन ती हक्काने मागितली पाहिजेत.

प्रार्थनेसाठी कोणतीही निश्चित वेळ नाही. आपण कुठल्याही वेळी देवाच्या सान्निध्यात जाऊ शकतो. तो केव्हाही आपल्याला सुलभतेने भेटण्यास तयार आहे. तो आपल्याला वर्णन करता येणार नाही अश्या कल्पनेच्या पलीकडे आपल्यावर प्रेम करतो.

**प्रार्थनेच्या कशा वेगवेगळ्या पद्धती आहेत?**

आपल्या रोजच्या गरजांसाठी आपण वेगळी प्रार्थना करतो. आपल्याकडे ज्या रोजच्या सहज उपलब्ध प्रार्थना आहेत त्या आपण देवाला सदर करतो. या मांडणी केलेल्या प्रार्थना आहेत. (ह्या पुस्तकातील विभाग ३ याचा उपयोग तुम्ही प्रार्थनेसाठी करू शकता) आपण आपले शब्द व वाक्य वापरून प्रार्थना करू शकतो. जरी आपल्याला आपले शब्द प्रदर्शित करता आले नाही तरी देव आपले विचार व भावना समजतो. तो आपला प्रेमळ प्रभू आहे.

देवाची इच्छा आहे कि आम्ही स्वतःसाठी व दुसऱ्यासाठी सुद्धा प्रार्थना करावी. जेव्हा आपण प्रार्थना करतो त्यावेळी आपल्या सारख्याच परिस्थिती मध्ये कोणी असेल तर त्याच्यासाठी सुद्धा प्रार्थना करावी (जरी आपण कोणाला ओळखत नसलो) अश्या प्रकारे आपण दुसर्याच्या जीवनात आशीर्वादित होतो. देवाला आपण आनंद देतो.

**जेव्हा आपण चिंतातूर असतो व आपले प्रार्थनेत लक्ष लागत नाही तेव्हा आपण काय करावे?**

जेव्हा आपण चिंतातूर असतो तेव्हा आपण देवाने आपल्या मागील आयुष्यात आपल्याला कसे आशीर्वादित केले ह्याची आठवण करावी

देवाला धनयवाद द्यावे कि त्याने आपल्याला मागील आयुष्यात किती आशीर्वाद दिलेत. देवाची व पित्याची स्तुती करावी. त्याच्या लोकांना त्याने किती आशीर्वादित केले याची आठवण करावी. पवित्र शास्त्रातल्या त्या गोष्टी आठवाव्यात कि त्याच्या लोकांना त्याने कसे आशीर्वादित केले? (उदा, इजिप्त मधून लोकांना कसे बाहेर आणले, तांबडा समुद्र दुभागला, वाळवंटातून चालताना लोकांबरोबर तो होता, अग्निज्वाला (अग्निस्तंभ व मेघस्तंभामध्ये तो बरोबर होता, वाळवंटात लोकांना अन्न आणि पाणी पुरवले) आणखी देवाची स्तुती व धन्यवाद असो. ज्यावेळी तुम्ही देवाची स्तुती कराल आणि व त्याला धन्यवाद द्याल. त्यावेळी तुमच्या मनाची स्थिती व भावना बदललेल्या दिसतील. आणखी तुम्ही भारावून जाऊन देवाची प्रार्थना कराल.

**उपवासाची आवश्यकता का आहे?**

उपवासामुळे आपण देवाच्य अधिक जवळ येतो व त्याची इच्छा काय आहे हे जाणून घेतो. उपवासामुळे आपले व देवाचे संबंध अधिक उंचावतात.

**उपवास कसा करावा?**

उपवास करायचे विभिन्न प्रकार आणि पद्धती आहेत. उपवास करण्याची वेळ, पद्धत बदलत राहतात. उपवास आठवड्याचा अर्धा दिवस असू शकतो आठवा ते सलग चाळीस दिवस अथवा अधिक काळापर्यंत असू शकतो.

सुरुवातीला आपण आठवड्यातून एकदा आर्ध्या दिवसासाठी (उदा- न्याहारी आणि दुपारचे जेवण न करता) करू शकतो. उपवास करणे म्हणजे पाण्याचा त्याग करणे नव्हे. या उलट उपवासाच्या दिवशी आपण अधिक पाणी पिणे गरजेचे आहे. उपवासाचा दिवस आपण अधिक प्रार्थनेत घालवणे आवश्यक आहे. आपण दुपारी किंवा सायंकाळी उपवास सोडू शकतो. अधिकतर लोक दुपारी ३ वाजता उपास सोडतात कारण त्यावेळी येशु ख्रिस्ताने आपल्यासाठी क्रुसावर आपला प्राण दिला आणि आपल्याला आपल्या पापापासून मुक्ती दिली व मृत्यूवर विजय मिळवला.

एकत्रित येउन (एक गट) उपवास. एकत्रित येउन आपण एकमेकांसाठी उपवास आणि प्रार्थना करून देवाकडे आपल्या गरजांसाठी मध्यस्थी करू शकतो.

उपवासाचे विभिन्न प्रकार आणि त्याबाबत अधिक माहिती साठी आपण इंटरनेट चा वापर करू शकता.

**३ वाजताची प्रार्थना म्हणजे काय?**

दुपारी ३ चा काळ हि वेळ म्हणजे येशु ख्रिस्त आपल्या संपूर्ण जगाच्या पापासाठी मरण पावला आणि जगाचा उद्धार केला हा तो समय आहे. त्या वेळी देवाने जगाचा पालट केला. हा तो तीन वाजताचा समय आहे. त्यावेळी येशु ख्रिस्ताने तुमच्या आणि आमच्या पापांसाठी वाढ स्तंभावर मरण पत्करले त्याच्या आपल्यासाठी असलेल्या प्रेमाचे हे प्रतिक आहे.

३ वाजताच्या प्रार्थनेसाठी प्रार्थना विभागाचा संदर्भ घ्यावा.

**पवित्र शास्त्र काय आहे?**

बायबल हि देवाच्या प्रेमाची एक कहाणी आहे. आपण जी त्याची लेकरं त्यांच्यावर त्यो किती प्रेम करतो त्याची हि एक कहाणी आहे. देवाच्या तुमच्या साठीच्या सुंदर योजनांबद्दल तुम्ही शास्त्रात वाचू शकता. देवाने जगाची निर्मिती कशी केली हे शास्त्र आपल्याला दर्शवते. तो आपल्यावर प्रेम करतो, त्याला आपल्याकडून काय हवे आहे, येशु आपल्यासाठी का व कशासाठी मरण पावला, आपल्या दैनंदी जीवनास्ठी त्याने काय सूचना दिल्या आहेत आणि खूप अद्भुत आणि आवड उत्पन्न करणाऱ्या व प्रेरणा देणाऱ्या गोष्टी आहेत.

बायबल हे अनेक लेखकांनी लिहिलेल्या पुस्तकांचा एक संग्रह आहे जे देवाच्या प्रेरणेने लिहिले आहे. म्हणून बायबल हे देवाचे वाचन आहे. बायबल मध्ये देवाच्या प्रीतीच्या गोष्टी आहेत.

- ख्रीस्तामधील आपली ओळख
- खऱ्या पुरातन गोष्टींचे अद्भुत संग्रह
- येशूचे जीवन
- देवाच्याबद्दल प्रेरणा देणारी वचने
- दैनिक जीवनामध्ये चालण्यासाठी सूचना
- देवाचे आपल्याबद्दल न डगमगणारे प्रेम, विशेष करून आपल्या दुःख, संकट व यातनासमयी

**बायबलमधील देवाच्या प्रेमाची गोष्ट (कहाणी) काय आहे?**

बायबल हे आपणावरील प्रेमाची कथा आहे. आकाश आणि पृथ्वी कशी निर्माण केली हे शास्त्र सांगते, मानवाची निर्मिती आणि त्यावरील प्रेम येशु ख्रिस्ताला त्याने या जगात आपल्यासाठी बलिदान देण्यासाठी पाठवले. त्याच्या आपल्या सानिध्या अद्भुत वचने आणि योजना

जुना करार जेव्हा तुम्ही वाचाल त्यात तुम्ही पाहाल देवाने त्याच्या प्रिय लोकांना मिस्र देशातील गुलामगिरीतून मुक्त केले, समुद्रातील पाणी दुभागले व मध्य समुद्रात रस्ता निर्माण करून त्याच्या लोकांना त्याने कुठलीही हानी न पोहोचवता समुद्रातून पार केले. देवाने कसे त्यांचे रक्षण आणि मार्गदर्शन केले. दिवस मेघस्तंभ आणि रात्री अग्नी स्तंभ उभारून त्यांचे मार्गदर्शन केले.

वाळवंटा मध्ये देवाने आकाशातून भाकरी (मन्ना) व दगडातून पाणी कसे दिले याची गोष्ट तुम्ही वाचू शकता. लोकांनी कसा त्याचा अपमान केला आणि कसे त्याला दुःखी केले हे हि तुम्ही त्यात वाचू शकता. तरी देवाने आपल्या प्रेमाखातीर त्यांना क्षमा केली आणि त्यांना आशीर्वाद दिले. १० वर्ष इस्रायील लोक वाळवंटात भटकत राहिले तरीही त्यांचे कपडे झिजले नाहीत व पाय चालून सुजले नाहीत. ह्या व अशा काही गोष्टी बायबल मध्ये दिल्या आहेत. बायबलमधील अशा काही अद्भुत गोष्टी तुम्हाला शास्त्र वाचल्यावर आढळतील.

**बायबल खरे आहे का?**

हो. बायबल खरे आहे. ते देवाचे वाचन आहे. बायबल मध्ये जे लिहिले आहे त्याबद्दल खूप लोकंमध्ये वादविवाद आहेत.

खूप लोकांनी प्रश्न उपस्थित केले पण त्याचे उत्तर योग्य समयी मिळत गेले. उत्खननातील पुराव्याद्वारे आणि ऐतिहासिक रेकॉर्ड द्वारे त्याची उत्तरे मिळाली आहेत. वैज्ञानिक दृष्टीकोनातून उद्भवणारे प्रश्न हे कालांतराने वैज्ञानिक पुरावे मिळाल्यानंतर सिद्ध झाले. तसेच इतर अनेक प्रश्न हे मनुष्याच्या मनात बायबल बद्दल अचूक सत्याविषयी आहेत. त्याचे उत्तर वैज्ञानिक दृष्टीकोनातून आणि ऐतिहासिक दृष्टीकोनातून मिळेल.

हे महत्त्वाचे आहे कि आपण देवावर आणि त्याच्या वचनावर विश्वास ठेवणे आवश्यक आहे. म्हणजे कालांतराने त्याची उत्तरे मिळतील. आपल्याला फक्त देवावर विश्वास ठेवणे आहे.

**मला बायबलचे वाचन कसे करायचे?**

बायबल हा विविध पुस्तकांचा एक संग्रह आहे. काही पुस्तकं गोष्टीची आहेत, काही ज्ञानाचा बोध करणारे आहेत, काही कवितांचा संग्रह आहे, तसेच काही सूचनात्मक गोष्टी सांगणारे आहे. येशुबद्दलची माहिती आणि त्याचे पृथ्वीवरील कार्य सांगणारी पुस्तके आहेत, आपल्याला प्रोत्साहन देणारी व पुढील भविष्याचा वेध देणारी आहेत. पुढे काय होणार याच्या सूचना देणारी आहेत.

तुम्ही जर पवित्र शास्त्र एक कादंबरी म्हणून सुरुवातीपासून शेवट पर्यंत वाचले तर तुम्हाला त्यामध्ये रस राहणार नाही. म्हणून तुम्हाला काय हवे आहे तुम्ही कशाचा शोध घेत आहात हे जाणून तुम्ही बायबल वाचणे योग्य आहे.

बायबल मध्ये दोन विभाग आहेत. जुना करार येशू ख्रिस्ताच्या आधीचा आणि नवा करार येशूच्या वेळचा आणि पुढील गोष्टींचा. तुम्हाला जर देवाने केलेल्या जगाच्या निर्मितीचे आणि त्याच्या ऐतिहासिक दिवसाचे वाचन करायचे असेल तर तुम्ही जुन्या करारातील उत्पत्ती, निर्गम, यहोशवा या सारखी पुस्तकं वाचू शकता व जर तुम्हाला येशु ख्रिस्त आणि त्याची मंडळी स्थापन झाली हे वाचायचा असेल तर तुम्ही नव्या करारातील पहिले पाच पुस्तके- मतय, मार्क, लूक, योहान आणि प्रेषिताची कृत्ये हे वाचू शकता. जर तुम्हाला देवाची स्तुती आणि मनन करायचे असेल तर तुम्ही स्त्रोत्र संहिता वाचू शकता.

**बायबलच्या वचनावर मनन कसे करावे**

बायबल हे देवाने आपल्याला दिलेल्या अभीवचनानी परिपूर्ण आहे. जसजसं आपण बायबल वाचत जातो तसतसं काही वचनं आपलं लक्ष आकर्षित करतात. पवित्र आत्म्याने आपले मार्गदर्शन करावे आणि आपल्याला देवाच्या वचनाचे शिक्षण द्यावे. म्हणून आपण प्रार्थना करावी म्हणजे देव आपल्याला त्याच्या योजना आणि त्यांनी दिलेले अभिवचन व आपल्या आयुष्याकर्ता त्याची इच्छा प्रकट करेल. त्याचे वाचन आपण भावपूर्ण आणि विश्वास ठेऊन वाचले पाहिजे.

**बायबल मधील सामर्थ्यशाली वचने काय आहेत?**

बायबल हे देवाने आपल्याला दिलेल्या अभीवचनानी परिपूर्ण आहे. या पुस्तकातील भाग ३ मध्ये आपल्याला अशी काही उदाहरणे आढळतील (प्रार्थनेचा विभाग) त्या प्रार्थनेमध्ये देवाने आपल्यासाठी दिलेले अभिवचन काही विशिष्ठ ओळींमध्ये आम्प्लायला बघावयास मिळेल. तुम्ही ते वाचून त्यावर मनन आणि चिंतन करू शकता आणि देवाचे आशीर्वाद अद्भूतपणे प्राप्त करू शकता.

**येशूने एवढे त्रासदायक मरण सोशिले. मग तो देव कसा असू शकतो?**

देव ज्याने आकाश आणि पृथ्वी निर्माण केली तो आपला प्रेमळ स्वर्गीय पिता आहे आणि येशु देवाचा पुत्र आहे. देवाने आपल्यावर केलेल्या त्याच्या अपार प्रीतीमुळे त्याने आपल्या पुत्राला ह्या जगात अर्पिलेल्या कोकराप्रमाणे आपल्या पापांसाठी वधस्तंभावरील मरण सहन करून आपल्याला आपल्या पापांपासून आणि अनंतकाळच्या मरणापासून मुक्ती दिली. देवापासून आपल्याला पाप आणि अनंतकाळच्या मरणापासून कोण वाचवू शकतं? माझ्या तुमच्या व संपूर्ण जगाच्या पापांसाठी येशु शिवाय कोण आपला प्राण देऊ शकतं आणि आपल्यावर एवढी मोठी प्रीती करू शकतं? खूप लोकांना येशु कोण आहे हे ठाऊक देखील नाही.

येशु आपल्या पापांसाठी मरण पावला हि गोष्ट अधिकतर लोकांना ठाऊक देखील नाही. येशु पेक्षा जास्त प्रीती कोण आपल्यावर करू शकतो.

**देव सर्व समर्थ आहे. आपल्या पापांची क्षमा करणे त्याला सहज शक्य आहे. मग येशुने आपल्या प्राणाची आहुती का दिली?**

देव आपला पिता एक प्रेमळ देव आहे. शब्दामध्ये त्याचे वर्णन करणे अशक्य आहे. देव आपल्या तत्वांवर एकनिष्ठ आहे. देवाच्या न्यायतत्व आणि धार्मिकतेप्रमाणे पाप्यांना शिक्षा हि झालीच पाहिजे पण त्याचवेळी तो आपल्यावर अद्भुत प्रीती देखील करतो. त्याची प्रीती आणि करुणेपायी तो पाप्यांना मुक्त करू इच्छितो. या दोन्ही गोष्टींची सांगड घालून देवाने येशूला या जगाचा मुक्तिदाता म्हणून आपल्या जागी पापाचे वेतन भोगावयास पाठवले.

हीच आपणावरील देवाची प्रीती आहे ज्याला कुठलीही तोड नाही.

**येशूने मृत्यूवर विजय कसा मिळवला? पुनरुत्थान म्हणजे काय?**

येशु ख्रिस्ताने स्वतःला क्रूस खांबावर आपल्यासाठी खिळले. ह्यासाठी कि आपल्या पापांची क्षमा व्हावी आणि आपणास शुद्धता प्राप्त व्हावी. तो आपल्यासाठी मरण पावला आणि पुरला गेला. त्याने मृत्यूवर विजय मिळवून तिसऱ्या दिवशी मेलेल्यातून पुन्हा उठला यालाच पुनरुत्थान म्हणतात.

पुनरुत्थानानंतर तो ४० दिवस आपल्या शिष्यांसोबत होता आणि मग तो स्वर्गात चढला. तो पुन्हा या पृथ्वीवर आपल्या महा गौरवात येणार आहे.

येशु आपला तारणारा आहे असा विश्वास जो कोणी धरेल त्याचा उद्धार होईल आणि त्याला तारण प्राप्त होईल.

**येशूविषयी असं काय आहे? येशु विषयी वेगळं असं काय आहे?**

येशु हा देवाचा पुत्र आहे. येशु विषयी अनेक विशिष्ठ गोष्टी आहेत. तो या जगात आम्हामध्ये राहावयास आणि ईश्वरी जीवन जगावयास शिकवण्यासाठी आला आहे. तो कुमारी मरीयेमच्या पोटी गव्हाणीत जन्माला आला. देव असल्या कारणामुळे त्याला पृथ्वीवर जगातील सर्व ऐश्वर्य आणि वैभव मिळू शकलं असतं पण त्याने नम्र जीवनशैली निवडली. त्याला आम्हामध्ये वस्ती करून राहणे योग्य वाटले.

तो जन्मला तेव्हा देवदूतांनी गाणी गायली आणि आनंदोत्सव साजरा केला. एक विशिष्ठ तारा श्रेष्ठत्व दाखवण्यासाठी दिसला आणि जाणकार माणसे दूरवरून सन्मान देण्यासाठी आली होती. त्याने आपल्याला पाप आणि मोह कसे टाळावेत आणि दैवी आयुष्य कसे जगावे हे दाखविले. आपल्याला पापापासून आणि मरणापासून सर्वकाळ विकत घेण्यासाठी त्याने क्रुसावर मरण पत्करले. तुम्ही कोठे ऐकले आहे का देव आपल्याला वाचवण्यासाठी व त्याच्या आणखी समीप आणून त्याच्या बरोबर सर्वकाळ राहण्यासाठी मरण पावला?

येशुबद्दल तीव्र प्रीतिभावना आणि त्याचे क्रुसावर मरण हे स्वर्गीय पित्याचे आपल्यासाठी असलेल्या प्रेमाचे सोदाहरण स्पष्टीकरण आहे. येशु मरणावर विजय मिळवण्यासाठी तिसऱ्या दिवशी पुनरुत्थित झाला. आपल्या प्रत्येक गोष्टीसाठी/ प्रश्नासाठी तो उत्तर आहे. तो आपले रोग बरे करणारा, आपल्याला आवश्यक ते पुरवणारा, आपला रक्षणकर्ता आपला स्वामी, आपला देव आपला मित्र, आपला राजा इत्यादी... हि यादी वाढत जाते असा आहे. मनसे आपली सर्वोत्तम अर्पणे त्यांच्या देवासमोर आणण्याची काळजी घेतात. येशु, देवाचा पुत्र अशा अर्पणाची अपेक्षा करीत नाही. त्याची इच्छा आहे कि आपण त्याच्या

कडे आपले भग्न अंतकरण, आपल्या समस्या, आपले आजार, आपली दुर्दश हे सर्व घेऊन जावे, म्हणजे तो ते सर्व आपल्यापासून काढून घेईल आणि आपल्याला त्याची मोहकता, त्याची करुणा आणि त्याच्या प्रेमाने भरून टाकेल.

**ख्रिस्ताच्या रक्तामध्ये काय विशेष आहे? ख्रिस्ताच्या रक्ताबद्दल लोक चर्चा का करतात?**

ख्रिस्ताच्या रक्ताला एक विशेष महत्त्व आहे. जेव्हा एखादी व्यक्ती येशूवर देवपुत्र म्हणून विश्वास ठेवते, ती / तो त्याला पापमुक्त करणारा म्हणून स्वीकारते. ख्रिस्ताचे रक्त त्याचे /तिचे पाप धुवून काढते आणि त्याला / तिला अन्तःकाळच्या मरणापासून वाचवते.

पूर्वी संगमरवरी दगड किंवा काचेचे तुकडे बसवून केलेल्या नक्षीकामाच्या दिवसातले नियम (प्राचीन जुन्या करारातील दिवस) धर्मोपदेशकाला वर्षातून एकदा मंदिराच्या वेदीवर जनावरांच्या रक्ताचे अर्पण, लोकांच्या पापांची क्षमा मिळवण्यासाठी करावे लागे. नियमाप्रमाणे रक्त सांडल्याशिवाय क्षमा नाही. तीव्र भावना, बळी आणि ख्रिस्ताच्या क्रूसावरील रक्ताने जेव्हा आपण त्याच्यावर विश्वास ठेवतो, त्याच्यासमोर आपली पापे कबूल करतो आणि पश्चाताप करतो, तो आपल्याला क्षमा करतो, त्याच्या मौल्यवान रक्ताने आपली पापे धुवून काढतो आणि आपल्याला सर्वकालासाठी वाचवतो.

"ख्रिस्ताचे रक्त" हा शब्दसमूह ख्रिस्ताचे क्रुसावर यज्ञीय मरण आणि त्याचे आपल्या ऐवजीचे प्रायश्चिताचे काम हा भाव व्यक्त करतो. येशूने रक्त सांडले आणि क्रुसावर तुझ्यासाठी, माझ्यासाठी आणि आपल्यासाठी सर्वांसाठी मरण पावला. आपण पापी होतो व आता जेव्हा येशूला आपला रक्षणकर्ता मानले आहे आणि पुन्हा (परत) विकत घेतले आहोत. ख्रिस्ताचे रक्त आपले सर्व संकटांपासून रक्षण करते.

**कोणी दुसऱ्या देवांबरोबर येशूची प्रार्थना करत असेल तर तो काय विचार करेल? येशूला कसे वाटेल?**

तुम्हाला कसे वाटेल कि ज्या व्यक्तीवर तुम्ही खूप प्रेम करता ती व्यक्ती जेवढे तुम्ही लायक आहात आणि जेवढी अपेक्षा करता, तेवढे प्रेम तुमच्यावर करत नसेल. तुम्हाला वाईट वाटेल. तरीही तुम्ही त्या व्यक्तीवर प्रेम करून आशेवर जगात राहाल.

तसेच जेव्हा आपण ख्रिस्ताला आपल्या जीवनात प्रथम स्थान देत नाही तेव्हा त्याला यातना होतात. पण येशु आपली ह्रदये आणि अंतःकरणे जाणतो. जेव्हा एखादी व्यक्ती देवावर प्रेम करीत नाही आणि त्याला आपल्या जीवनात अग्रस्थान देत नाही, येशु संयमपुर्वकतेने त्या दिवसाची वाट बघत असतो. प्रत्येकाला सत्य काय ते समजेल आणि सत्यच आपल्याला मुक्त करेल. येशु संयमाने त्या दिवसाची वाट पाहत आहे. आपणा देवाशी - त्याच्या प्रेमात जुळले जाऊ.

**क्रुसावर खिळे ठोकलेल्या, यातनांनी भरलेल्या येशूची उपासना लोक कशी करू शकतात? हे सर्व किती निष्ठुर आणि यातना देणारे आहे.**

क्रूस आपल्याला देवाच्या आपल्यावरील प्रेमाची आठवण करून देतो. देवाने कसे आपला एक पुत्र आपला अधिपती येशु ख्रिस्त याला आपल्यासाठी क्रुसावर मरण भोगण्यास आपली पापे, आजार व मरण यापासून मुक्तता करण्यास (आपल्याला वाचविण्यास) पाठवले. क्रूस शुभ समाचार सांगतो, देव आपल्यावर प्रेम करतो व आपण त्याच्या बरोबर सर्वकाळ राहावे आणि ख्रिस्ताचा आपला रक्षणकर्ता म्हणून स्वीकार करावा हे दर्शवतो. क्रूस आशा आणि प्रेम दर्शवतो. आपण कृसाकडे त्या दृष्टीकोनातून पाहतो तेव्हा आपल्याला येशूचे क्रुसावर असणे महत्त्वाचे का आहे याचा खरा अर्थ समजतो.

आपण हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे कि येशूचे पुनरुत्थान झाले, त्याने मरणावर विजय मिळवला, तो आपला जिवंत देव आहे.

**ख्रिस्ती लोकांनी पाश्चिमात्य रिती स्वीकारल्या आहेत.जर मी येशु ख्रिस्तावर विश्वास ठेवला तर मलाही त्यांच्यासारखे होणे आवश्यक आहे का?**

परिवर्तन हे हृदयात आणि अंतःकरणात होते. येशूवर विश्वास ठेवण्यास बाहेरचे बदल आवश्यक नाहीत. जेव्हा एखादी व्यक्ती येशूवर विश्वास ठेऊन एकांतात प्रार्थना करण्यात वेळ घालवते, तेव्हा पवित्र आत्मा त्याला / तिला मार्गदर्शन करतो कि कसे आपण देवाच्या समीप असले असले पाहिजे.

काही लोक नव्या गोष्टी आपली व समाजात स्वीकारतात पण ते सक्तीचे नाही, आपली अंतःकरणे आणि मने आपल्या अंगीक गोष्टींपेक्षा देवाला जास्त महत्वाची आहेत.

**मी येशूवर विश्वास ठेवतो. असे काही आहे का ज्यामुळे माझी जीवनशैली बदलली पाहिजे?**

होय. पण तुम्ही स्वतःच्या जीवनशैलीत बदल करण्यासाठी जबरदस्ती करू शकत नाही. एकदा तुम्ही येशूवर विश्वास ठेवून त्याला वैयक्तिक रक्षणकर्ता मानून तुमचे हृदय, मन, आत्मा आणि वेळ त्याच्या ताब्यात द्या. आपला वेळ एकांतात त्याच्या हजेरीत, शांततेत प्रार्थनेत घालवा. जर तुम्ही हि शिस्त वाढवलीत तर पवित्र आत्मा तुम्हाला तुमचे नाते परमेश्वराशी जास्त खोल आणि वैयक्तिक असे करण्यासाठी मार्गदर्शन करेल.

**ख्रिस्ती लोक मंदिरात द्राक्षरस पितात काय?**
नाही. ख्रिस्ती लोकांबद्दलची हि चुकीची समजूत आहे. तुम्हाला मंदिरातील भक्तीत भाग घ्यायला आवडेल का? तसे केल्याने तुम्ही उपदेश (देवाचे वचन) ऐकू शकाल, धार्मिक विधी पाहू शकाल आणि त्या विधींचा अर्थ समजू शकाल.

**मंदिर परमेश्वराची भक्ती करण्याची जागा आहे. एखादी व्यक्ती भक्तीच्या ठिकाणी पादत्राणे घालून कशी काय जाऊ शकते?**
जेव्हा आपणा ख्रिस्ताला आपला तारणारा मानतो, आपण स्वतः देवाचे मंदिर आहोत व पवित्र आत्मा त्यात वास करतो. महत्त्वाचे हे आहे की आपण स्वतःलाच प्रश्न विचारायला हवा कि आपली मने हृदये स्वच्छ आहेत कि नाहीत. जेव्हा आपण बाह्य स्वच्छता विचारात घेतो त्याआधी पण जेव्हा आपण येशूच्या मागे मागे जातोतेव्हा आपले हृदय आणि अंतःकरणाचा काळ काय आहे यावर अवलंबून असते.
सर्वसामान्यपणे जेव्हा तुम्ही मंदिरात प्रवेश करता तेव्हा आपण पादत्राणे काढली नाहीत तरी चालते. तरीही अशी खूप मंदिरे छोट्या शहरात आणि गावात आहेत जिथे मंदिरात जाताना मंदिरे स्वच्छ ठेवण्यासाठी लोक आपली पादत्राणे काढून ठेवतात.

**ख्रिताच्या मागे जाण्यासाठी मला काय करायचे आहे? मी ख्रिस्तावर विश्वास ठेवतो तर मी कशाचा त्याग करावा?**
येशु ख्रिस्त देवाचा पुत्र आहे यावर विश्वास ठेऊन आपली प्रार्थनेच्या सर्व मागण्या विश्वासाने आणा. त्याच्याकडे आपल्यासाठी मोठ्या योजना आहेत हे जाणा. तुमच्या अंतःकरणात जाणून घ्या कि तो आपला देव आहे. आपल्याला बरे करणारा, आपल्याला आपल्या पापांपासून सोडविणारा, आपला मित्र आणि मुक्तीदाता आहे.
तुमच्या दैनंदिन जीवनात शिस्त आणा. देवाच्या सान्निध्यात आणि प्रार्थनेत वेळ घालवा. येशूकडे प्रार्थना करा कि त्याने तुम्हाला आयुष्याच्या प्रत्येक पाऊलावर मार्गदर्शन करावे. प्रार्थनेद्वारे त्याला विचार तुम्ही कोणत्या गोष्टींचा त्याग करणे आवश्यक आहे. त्याला विनंती करा म्हणजे तो तुम्हाला मार्गदर्शन करेल आणि पवित्र आत्म्याच्या शक्तीने तुमचे जीवन चांगुलपणासाठी बदलले जाईल. / ते तो शक्य करेल.

तुम्ही तुमची जीवनशैली अन्नासाठी, वस्त्रासाठी, निवाऱ्यासाठी, संस्कृतीसाठी किंवा दुसरे तसे काही यासाठी त्यागाने (त्यापासून दूर जाणे) आवश्यक नाही. अंतर्मनाचा, अंतःकरणाचा बदल तसेच मनाचा बदल यावर तुमचे लक्ष केंद्रित करा. ख्रिस्ताला आपल्याला योग्य मार्ग दाखवू द्या.

**जर मी येशु ख्रिस्तावर विश्वास ठेवतो तर मी कोणते धार्मिक विधी केले पाहिजेत?**

सर्वात महत्वाचे म्हणजे देवाशी आपले मैत्रीचे नाते. धार्मिक विधी गौण आहेत. देवाला आपल्या गरजा ठाऊक आहेत. दैनंदिन जीवनात देवाच्या सहवासात रोज राहण्यासाठी व प्रार्थनेमध्ये वेळ घालवण्यासाठी स्वतःला शिस्त लावा. प्रार्थना करताना तुम्ही काही विशिष्ठ स्वरुपाची पद्धत वापरण्याची गरज नाही. तुम्ही देवाच्या सान्निध्यात वेळ घालविण्यास सुरुवात करा. तो तुम्हाला मार्गदर्शन करेल आणि तुम्ही तुमच्या त्याच्याबरोबरच्या प्रवासाचा आनंद घ्याल.

तुम्हाला जर ख्रिस्ताबद्दल अधिक जाणायाचे आहे किंवा तुमच्या मनात एखादा विशिष्ठ प्रश्न असेल तर तुम्ही ख्रिस्ताच्या इतर अनुयायांसोबत चर्चा करू शकता.

**मंदिरात जाणे आवश्यक आहे का?**
देव तुमच्यावर प्रेम करतो. तुम्ही परमेश्वरावर प्रेम करता का. तुमच्या अध्यात्मिक प्रवासात देवाला ओळखण्यात जी प्रगती केली आहे. त्याबद्दल समाधानी आहात काय? किंवा तुम्हाला त्याच्याबद्दल अधिक जाणून घेऊन त्याच्यावर जास्त प्रेम करायचे आहे का? त्याच्या अधिक जवळ जाऊन त्याची मोहकता आणि आशीर्वाद अनुभवायचे आहेत का?
केवळ धार्मिक विधी पाळायचे म्हणून मंदिरात जाऊ नका. परमेश्वराच्या प्रेमासाठी आणि परमेश्वराशी तुमचे वैयक्तिक नाते लक्षात ठेऊन मंदिरात जात जा. एकदा का तुम्ही परमेश्वराचे तुमच्यावरील आगाध प्रेम अनुभवाल तर तुमच्या त्याच्याबरोबरच्या वाटचालीत मार्गदर्शक होऊ द्या.

**मूर्तीपूजा काय आहे?**
जेव्हा एखादी व्यक्ती खऱ्या देवापेक्षा इतर कोणाला जास्त आदर देते किंवा त्याची भक्ती करते त्याला मूर्तीपूजा म्हणतात. एखादी व्यक्ती एखाद्या पुतळ्याला देव मानून त्याला आदर देऊन त्याची भक्ती करेल किंवा दुसरी व्यक्ती एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीला आदर देऊन त्याची प्रशंसा करेल, एखादी व्यक्ती इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा किंवा कोणाहीपेक्षा पैशावर जास्त प्रेम करेल हि काही मुर्तीपुजेची उदाहरणे आहेत.
आपण आपल्या देवावर प्रेम करून त्याची भक्ती करण्यासाठी निर्माण केलेले आहोत. आकाश आणि पृथ्वी यांना निर्माण करणारा कोण आहे? तो आपला प्रेमळ पिता आहे आणि आपण त्याची मुले आहोत. आपल्या जीवनात इतर कोणत्याही गोष्टींपेक्षा किंवा इतर कोणाही व्यक्तीपेक्षा अग्रस्थान (प्रथमस्थान) त्याला दिले पाहिजे.

**लोक मूर्तीची भक्ती (उपासना) का करतात? मूर्तीची प्रार्थना लोकांनी करू नये का?**
सर्वसाधारणपणे इतर लोक जे करतात त्याचे अनुकरण लोक करतात किंवा जे ते त्यांच्या मोठ्या व्यक्तींपासून शिकतात किंवा बघतात त्याचे अनुकरण करतात. अनेकदा लोक धार्मिक विधींबद्दल प्रश्न विचारत नाहीत. किंवा ठराविक विधी व कृती यांच्याबद्दल किंवा त्यांच्या हेतूबद्दल जाणून घेण्याचा प्रयत्न करीत नाहीत. खूप लोकांच्या मनात खोटा विश्वास आहे कि पुतळे आणि मूर्ती देव आहेत. त्यामुळे मूर्ती पूजा करण्यात त्यांचा शेवट होतो.
एकदा का आपण कोणतीही गोष्ट का करतो याबद्दल उत्सुक असलो तर आपल्याला सत्य जाणून घेण्याची पद्धत सापडेल. अंतिम सत्य फक्त देवाकडेच आहे. देवाचे सत्य आपण आपल्या ह्रदयाने जाणतो, परमेश्वर स्वतःच स्वतःला प्रकट करू लागतो आणि त्याचे वाढते प्रेम व त्याचे सत्य आपल्याला मुक्त करते.
आपण जेव्हा आपला देवपिता याची प्रार्थना करतो तेव्हा इतर मूर्तीची प्रार्थना करणे गरजेचे आहे काय?

**खूप लोक सुर्य, चंद्र, तारे, ग्रह आणि निसर्गाची भक्ती करतात. निसर्गाची भक्ती करणे चुकीचे आहे का?**
देवाने आकाश आणि पृथ्वी निर्माण केली. वर आकाशात आणि खाली पृथ्वीवर जे काही आहे ते सर्व देवानेच बनविले. सुर्य, चंद्र, तारे, ग्रह आणि निसर्ग त्याची निर्मिती आहे. लोकांनी निर्मितीची भक्ती करावी कि निर्माणकर्त्याची?
काही लोकांना वाटते कि सुर्य, चंद्र, तारे, ग्रह आणि निसर्ग हे देव आहेत किंवा देव या गोष्टींमध्ये वास करतो. आपण आपले लक्ष या विचारांवर केंद्रित करू नये. निर्माता देव आपला प्रेमळ स्वर्गीय पिता आहे. ज्याने आपल्याला निर्माण केले, तो आपल्यावर प्रेम करतो आणि आपल्या प्रेमाची अपेक्षा करतो. त्याची भक्ती आपण का करू नये?

**काही ख्रिस्ती लोक नेहमी पापाबद्दल बोलतात. ती उदास/ खिन्न माणसे आहेत. एखाद्याने पापाबद्दल चर्चा का करावी?**
देवाने आपल्याला त्याची प्रतिकृती बनवली पण पापाने आपल्याला त्याच्यापासून वेगळे केले. आपल्याला पुन्हा त्याच्याकडे वळविण्यासाठी देवाने त्याचा पुत्र येशु ख्रिस्त याला आपण केलेल्या सर्व पापांसाठी बळी म्हणून क्रुसावर मरण सोसण्यास पाठविले. राजा येशूच्या या यज्ञीय मरणानंतर व त्याच्या पुनरुत्थाना नंतर आपण अनंत कालच्या पापापासून व मृत्युपासून वाचविले गेलोत, कधी तर जर आपण येशूला देवाचा पुत्र आपला रक्षण कर्ता व राजा म्हणून स्वीकारले तर.

जे लोक हे सत्य समजतात ते इतके उत्साही होतील कि त्यांना हे सत्य इतरांबरोबर वाटून घ्यावेसे वाटेल, जेणेकरून ते सुद्धा वाचविले जातील आणि म्हणून खूप लोक पापाबद्दल बोलतात, केवळ पापांचे परिणाम आणि त्यातून वाचण्याचा मार्ग मिळण्यासाठी.

**प्रत्येक माणूस पापी नसतो. आपण कसे म्हणू शकतो कि प्रत्येक माणूस हा पापीच जन्मलेला आहे?**

आदाम आणि हव्वा प्रथम मानव- ज्या देवाने त्याच्या स्वतःच्या प्रतीरुपाचा निर्माण केले. त्यांनी देवाची आज्ञा मानली नाही. त्यांच्याकडूनच पृथ्वीवर पाप आले. लहापणापासून आपल्याला शिकविले जाते कि (कोणतीही गोष्ट) आपण इतरांबरोबर वाटून घ्यावी आणि इतरांचा विचार करावा. एखादी गोष्ट केवळ आपल्यासाठीच ठेवणे व इतरांबरोबर वाटून न घेणे म्हणजे स्वार्थी, लोभी आणि चुकीचे आहे.

तुम्ही कधी लहान बालकांचे निरीक्षण केले आहे का? लहान मुलाला जर तुम्ही एखादे खेळणे दिले तर ते बाळ ते खेळणे घट्ट धरून ठेवते. जेव्हा तुम्ही ते घेण्याचा प्रयत्न करता तेव्हा ते बाळ विरोध करते, खेळणे मागे खेचते आणि नंतर रडते. ते बाळ स्वार्थी नाही का? हि सवय बाळाला कोणी लावली? कोणीच नाही. मग बाळाला हि सवय कशी लागली? हे एक उदाहरण आहे. आपल्याला दाखवून देते कि पापाने आपल्या जन्माआधी आपल्या जीवनात कसा शिरकाव केला.

आपल्यापैकी अनेकांना पापाच्या कल्पनेचा त्रास होतो. काही वेळेस आपण चांगले असण्याचा प्रयत्न करतो. आपल्या जीवनाची एकही क्षेत्रे आणि परिस्थिती अशी असते कि आपला शेवट वाईट विचार, राग, मत्सर, पाप वासना, खोटे बोलणे किंवा आपल्या बोलण्याने इतर दुखावणे यात होतो.

नंतर आपल्याला सर्व पापांपासून अनंत काळची मुक्ती मिळवण्यासाठी कशाची तरी गरज भासते. हि क्षमा फक्त देवापासून म्हणजेच येशु ख्रिस्ता करवी मिळणे शक्य आहे.

**आपण पापापासून दूर कसे राहू शकतो?**

आपण देवाच्या जास्तीत जास्त जवळ चालतो, आपल्याला चांगले काय आणि वाईट काय याबद्दल जास्त फरक जाणवतो व परमेश्वराचे पावित्र्य पापापासून दूर राहण्यास आपल्याला मदत करतो.

देवाबरोबर जास्त जवळकीचे नाते वाढविणे महत्त्वाचे आहे.

**आपल्या पापांसाठी आपल्याला कशी क्षमा केली जाईल?**

येशु आपल्या पापांसाठी मरण पावला. तो देवाचा पुत्र आहे. म्हणू आम्ही जेव्हा त्याच्यावर विश्वास ठेवतो आणि त्याला आपला तारणार मानतो आपण आपल्या पापांची कबुली त्याच्याकडे देतो, प्रायश्चित करून / पश्चाताप करून त्याच्याकडून क्षमा मिळवतो, नंतर तो आपली सर्व पापे धुवून काढतो, आपल्याला क्षमा करतो. आपण त्याच्यासाठी त्याची नवीन निर्मिती ठरतो. आपल्या जुन्या पापांची क्षमा झाली आहे आणि देव ती विसरून गेलाय.

**मी नेहमी इतरांना मदत करतो आणि त्यांची काळजी घेतो. माझ्यामध्ये कोणतेही पाप नाही. मग मी पापाबद्दल का बोलावे?**

चांगले काम करणे आणि इतरांना मदत करणे याचा अर्थ असा नाही कि एखाद्यामध्ये पाप नाही. पाप म्हणजे चोरी, खून, एखाद्याला लुबाडणे हे असे गुन्हे नव्हेत. जेव्हा आपण रागात असतो, उद्धट, मत्सरी, गर्विष्ठ, खोटे बोलतो, आपल्यात लालसा असते तरीही आपण पाप करतो. काही वेळेस आपल्यात कमतरता / उणीव आहे, अपयश आहे हे स्वीकारणे कठीण आहे. त्यापेक्षा ते कबूल करणे, त्याबद्दल बोलणे जास्त कठीण आहे.

देवाची इच्छा आहे कि आपण पापांपासून मुक्त व्हावे. त्याची इच्छा आहे कि आपण आपल्या चुका व पापे त्याच्यासमोर कबूल करावीत. पश्चाताप करावा म्हणजे तो आपल्याला ख्रिस्ताच्या रक्ताने धुवून काढील व स्वच्छ करेल.

**पापांची कबुली म्हणजे काय? मी पापांची कबुली का द्यावी?**

पापांची कबुली हि एक प्रक्रिया आहे कि आपल्या जीवनात आपण पापे केली आहेत व त्याची देवाला कबुली द्यावी कि आपण आपल्या आयष्यात ह्या चुका केल्या आहेत. आपण जेव्हा आपली पापे कबुल करतो तेव्हा पश्चाताप करावा आणि त्याच्याकडून क्षमेची याचना करावी.

परमेश्वराचे वाचन आपल्याला आश्वासन देते कि "जर आपण आपली पापे कबूल केली तर तो न्यायी आणि विश्वासू आहे आणि आपल्या पापांची क्षमा करेल व आपल्याला आपल्या अप्रामाणिकपणाबद्दल शुद्ध करेल.

**पश्चाताप करणे म्हणजे काय? एखाद्याने पश्चाताप कसा करावा?**

कबुलीच्या नंतर देवाची इच्छा आहे कि पापाबद्दल आणि मागे झालेल्या चुकीच्या कृतीबद्दल पश्चातापहि करावा आपल्या पापी कृत्यापासून दूर व्हावे आणि त्या ऐवजी त्याच्या मागे जावे.
पश्चाताप म्हणजे आपल्याकडून ज्या चुका झाल्यात त्यांच्याबद्दल वाईट वाटणे किंवा पश्चाताप होणे आपल्याकडून त्या चुका पुन्हा होऊ नयेत हि इच्छा. जेव्हा आपणा देवासमोर क्षमेसाठी हात पुढे नेतो, आपण त्याला विनंती करतो कि आपल्याला चांगले होण्यासाठी शक्ती द्यावी. पश्चातापाचा अर्थ असा नव्हे कि आपण पूर्णपणे निर्दोष आहोत.
आपल्या प्रेमळ स्वर्गीय पित्याला माहित आहे कि आपण कदाचित कुमार्गाला जाऊ शकतो. तसेही प्रत्येक वेळी आपण देवासमोर आपले पश्चातापी हृदय घेऊन क्षमेसाठी जातो व आपल्याला ती मिळते. ह्या प्रक्रियेमध्ये देव आपल्याला हळूहळू आपण चांगले होण्यासाठी घडवत असतो, पाले देवाबरोबरचे नाते जास्त खोल होत जाते.
पवित्र शास्त्र म्हणते कि आपण जेव्हा पश्चाताप करतो आणि देवाचा शोध घेतो, येशु आपल्याला स्वतः मदत करेल, *"माझ्या प्रिय मुलांनो मी हे तुम्हासाठी लिहितो कि तुम्ही पाप करणार नाही - पण जर एखाद्याने पाप केले एक व्यक्ती आहे जी आपल्या समर्थनासाठी / बचावासाठी पित्याशी बोलेल - येशु ख्रिस्त- सदाचरणी. तो आपल्या पापांसाठी प्रायश्चित्त घेतो, फक्त आपल्या पापांसाठीच नाही तर सर्व जगाच्या पापांसाठी.*
आपल्याला देवाच्या स्वभावावरून शिकावयाचे आहे व त्याच्या मागोमाग जावयाचे आहे. आपण पापे करतो आणि देवाची क्षमा मागतो आणि प्रत्येक वेळी देव आपल्याला क्षमा करतो. त्याच प्रमाणे आपण इतरांना क्षमा करावी. शास्त्र आपल्याला हे शिकविते. "एकमेकांबरोबर दयाळू आणि कनवाळू व्हा, एकमेकांना क्षमा करा जशी ख्रिस्तामध्ये देवाने आपल्याला क्षमा केली.

**परमेश्वराचे चिलखत म्हणजे काय?**

परमेश्वराचे चिलखत म्हणजे अध्यात्मिक चिलखत ज्याच्यावर आपल्या रोजच्या नकारात्मका बद्दलच्या शक्तीविरुद्ध लढताना त्याच्यावर अवलंबून राहू शकतो. देवाच्या चिलखतात मुक्तीचे शिरस्त्राण, सत्याचा कमर पट्टा, छातीच्या रक्षणार्थ असलेले सदाचरणाचे कवच, ख्रिस्ताची शांतीची शिकवण देणारे जोडे, विश्वासाची ढाल, चैतन्याची तलवार जी देवाचे वचन आहे.
(प्रार्थनेचा विभाग) कृपा करून ह्या विभागाचा विभाग तीन (प्रार्थनेवर आधारित) चा संदर्भ घ्या आणि जाणून घ्या. आपण प्रार्थना कशी करावी आणि रोज देवाकडून संरक्षण मिळावे म्हणून देवाचे चिलखत घालावे आणि देवाचे संरक्षण आपल्या जीवनात मिळवावे. हि प्रार्थना सकाळच्या तुमच्या परीपाठाचा हिस्सा होऊन जाईल. ह्यासाठी देवाचे चिलखत रोज घाला. ह्या प्रार्थना देवाचे सामर्थ्य आणि काही करण्याची ताकद तुमच्या दैनंदिन जीवनात अध्यात्मिक आव्हाने आहेत. त्यांना धैर्याने तोंड देण्यास तयार करतात. आपण जेव्हा देवाचे अध्यात्मिक चिलखत घालतो, ते आपले अंतःकरण आणि हृदय यांचे नकारात्मक विचार आणि भावना यापासून संरक्षण करते आणि ह्या अध्यात्मिक आघाताविरुद्ध खंबीरपणे उभे करते.

**ख्रिस्तामध्ये स्वतःला मोकळे सोडणे म्हणजे काय? ख्रिस्तामध्ये स्वातंत्र्य म्हणजे काय?**

पहिला प्रश्न कोणीही विचारेल. आपल्याला कशामधून मोकळे करायचे आहे? काही क्षण आपण आपल्या जीवनावर विचार करूया. भय मत्सर, कडवटपणा, क्रोध, क्षमा न करणे, भूतकाळातील दुःख, व्यसन, तीव्र वासना, स्वताची अनुकंपनीय प्रतिमा इत्यादी सारख्या समप्रवृत्ती आणि समकृती तुमच्या जीवनात / आयुष्यात आहेत याची जाणीव आहे का? हि एक नैसर्गिक प्रवृत्ती असते कि अशा प्रवृत्ती आपल्या जीवनात आहेत हे नाकारणे. जेव्हा आपण खरेपणाने आपल्या हृदयाचे परीक्षण करतो

आपल्याला जाणवते / दिसते कि आपल्या जीवनात अशा काही जागा आहेत, कि जिथं आपण सुधारणा करायला हवी. आपण सुधारायला हवे पण आपण पुन्हा पुन्हा असफल होतो. जेव्हा आपण आपल्या सामर्थ्याने बदलायचा प्रयत्न करतो. आपण मग प्रश्न विचारतो आम्ही आपणाला या नकारात्मक विचारापासून, कृती व प्रवृत्तीपासून स्वतःला मुक्त करू शकतो का? येशु एकच असा आहे कि जो आपल्याला मुक्त करू शकतो. येशु म्हणतो, "आणि तुम्हाला सत्य कळेल आणि सत्य तुम्हाला मुक्त / मोकळे करेल.

ख्रिस्ताला आपण वैयक्तिक तारणारा स्वीकारून आपण केलेल्या पापांची कबुली करून क्षमेची याचना करणे, चांगलं होण्यासाठी त्याची शक्ती मिळविणे, आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवणे कि येशूचे कुसावरील मरण व त्याचे पुनरुत्थान यांनी आपल्याला पापापासून मुक्त जीवन जगणे शक्य केले आहे. आपला वेळ देवाच्या सानिध्यात घालविणे, पवित्र शास्त्र वाचण्यात वेळ घालविणे व प्रार्थनेमध्ये राहणे आपल्याला पापापासून दूर व देवाच्या जवळ नेण्यास मार्गदर्शक होईल.